दिनांक ०६/०३/२०२५ (गुरूवार)

---

## पोलीसांच्या सतर्क रात्रगस्त मुळे घरफोडी चे गुन्हे उघड
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक ०४/०३/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा यांचे पथक नागपुर विभागात विभागिय रात्रगस्त करीत असतांना पोलीसांना **सकाळी ०५:०० वाजेच्या दरम्यान पोलीस स्टेशन बोरी हद्दीत अंबिका बार अॅन्ड रेस्ट्रॉरन्ट समोर एक ऑटो संशयीत रित्या जाताना दिसला.पोलीसांचे वाहन पाहुन संशयीतांनी त्यांचा ऑटो हा वर्धा नागपुर रोडने वळवला आणि पळुन जावु लागले. पोलीसांनी ऑटोचा पाठलाग केला असता सदर ऑटोमधील संशयीत ४ व्यक्ती हे मोहगाव शिवार येथे ऑटो रोडवर सोडुन पळु लागले. संशयीत व्यक्ती हे अंधारात जंगलाच्या दिशेने पळाले पोलीसांनी शिताफिने पाठलाग करून एका महीला आरोपीला ताब्यात घेतले. सदर महीला आरोपीला ताब्यात घेवुन चौकशी केली असता तिने तिचे साथीदार १.समीर समीम खान, रा. डोबी मोहल्ला, मोमीनपुरा, नागपुर, २.वसीम शेख, रा. मरियम नगर बर्डी,नागपुर, ३. रेहान नावाचा इसम यांच्या सोबत मिळुन पोस्टे सिताबर्डी नागपुर शहर, नागपुर शहर व पोस्टे बोरी अंतर्गत चोरी केल्याची माहीती प्राप्त झाली.**

**आरोपी कडुन पंचासमक्ष एक ऑटो क्र. एम.एच. ३१ डी.एस. ३८०० किंमत २,५०,०००/— रूपये, दोन मोबाईल १६,००० /— रूपये, रोख रक्कम ७१६०/— रूपये असा एकुण २,७३,१६० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाई मध्ये पोलीस स्टेशन बोरी अपराध क्र २७५/२०२५ कलम ३३१(४), ३०५(अ), ३(५) भान्यासं आणि पोलीस स्टेशन सिताबर्डी ,नागपुर शहर येथील अप क्र १७८/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं असे गुन्हे उघडकीस आले.**




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर